# प्रेस नोट

अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव
दि.२५.०२.२०२१

**आलोसे ज्ञानदेव साहेबराव चव्हाण, वरीष्ठ लिपीक तथा प्रभारी सहायक दुयम निबंधक, नोदंणी व मुंद्राक कार्यालय, पाचोरा जि.जळगांव यांना शासकिय फि ८००/–रु.व त्या व्यतिरीक्त ७००/–रु लाचेची रक्कम अशी एकुण १५००/–रुपये स्विकारतांना रंगेहाथ पकडले.**

---

यातील तक्रारदार यांनी वारस दाखल्याचे प्रकरण न्यायालयात दाखल करणेसाठी शेती मिळकतीच्या व घर मिळकतीच्या एकुण ०८ उता–यांचे मुंल्याकन मिळणेसाठी दुयम निबंधक कार्यालय,पाचोरा येथे अर्ज सादर केला होता व सदरचे दाखले मिळणेबाबत प्रभारी सहायक दुयम निबंधक,श्री.ज्ञानदेव चव्हाण यांची भेट घेवुन दाखले देणेबाबत विनंती केली असता प्रभारी सहायक दुयम निबंधक,श्री.ज्ञानदेव चव्हाण यांनी सदर मुंल्याकनाचे ०८ दाखल्यांची शासकिय फि ८००/–रु.व त्याव्यतिरीक्त प्रत्येक दाखल्याचे १००/–रु.याप्रमाणे ०८ दाखल्याचे ८००/–रु.लाचेची रक्कम असे एकुण १,६००/–रुपयांची मागणी केल्याने तक्रारदार अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव यांचेकडेस तक्रार दिली होती.

सदर तक्रारीवरुन आज दि.२५.०२.२०२१ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव पथकाने पडताळणी केली असता प्रभारी सहायक दुयम निबंधक,श्री.ज्ञानदेव चव्हाण यांनी तक्रारदार यांचेकडेस मुंल्याकनांचे ०८ दाखल्यांची शासकिय फि ८००/–रु.व त्याव्यतिरीक्त ०८ दाखल्यांचे तडजोडीअंती ७००/–रु.लाचेची रक्कम अशी एकुण १५००/–रुपयांची मागणी केली. त्यानंतर सापळा आयोजित केला असता आलोसे प्रभारी सहायक दुयम निबंधक,श्री. ज्ञानदेव चव्हाण यांनी तक्रारदार यांचेकडुन शासकिय फि ८००/–रु.व त्या व्यतिरीक्त ७००/–रु.पंच साक्षीदार यांचे समक्ष स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकिय कार्यालयामध्ये कोणी शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयाशी सपंर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुटीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहीती पाहीजे असल्यास खालील मोबाईल कमांक व दुरध्वनीवर संपर्क साधावा. महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोयीच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी लॅन्डलाईन ते लॅन्डलाईन व मोबाईल ते लॅन्डलाईन अशी टोल फ्रि नंबर १०६४ ची सेवा सुरु करण्यात आली असुन सदर कमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली संबधी व करावयाच्या तक्रारी संबधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अ.क्र. | युनिटचे नाव | दुरध्वनी/मोबाईल कमांक | टोल फ्रि नंबर |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३–२५७५६२८, २५७८२३० | १०६४ |
| २ | अहमदनगर | ०२४१–२४२३६७७ | १०६४ |
| ३ | धुळे | ०२५६२–२३४०२० | १०६४ |
| ४ | नंदुरबार | ०२५६४–२३०००९ | १०६४ |
| ५ | जळगांव | ०२५७–२२३५४७७<br>मो.कं.९६०७५५६५५६ | १०६४ |

(एन.एस.लोधी)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव.